# समाजकार्य अहवाल



## संदिप मुरलीधर भसे

/Sandeepbhase +91 98226 23688







“

महिला सक्षमीकरण व बळकटीकरणासाठी आळंदी परिसरातील
महिला व बचत गटांसाठी मोफत ब्युटी पार्लर, शिवण क्लासचे आयोजन
व शिलाई मशिनचे वाटप करण्यात आले.

”


कमलेश अँटी










कोजागिरी पौर्णिमे निमित्ताने परिसरातील महिलांसाठी
होम मिनिस्टर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.





"मकरसंक्रांती सणाच्या निमित्ताने परिसरातील
महिलांसाठी हळदी-कुंकवाचा कार्यक्रम घेण्यात आला."





कमलेश ॲटो युवा मंच तर्फे महिलांसाठी
क्रिडा स्पर्धाचे आयोजन करण्यात आले.

# दि. ३ नोव्हेंबर रोजी दै. लोकमतने सामाजिक कार्याची घेतलेली दखल

## प्रशिक्षण शिबिर

**आळंदी** - दीपावलीचे औचित्य साधून सुरू करण्यात आलेल्या शिवण क्लास व ब्युटी पार्लर व्यावसायिक प्रशिक्षण शिबिरास महिलांचा प्रचंड प्रतिसाद मिळत आहे. सर्वच महिला पैसे देऊन क्लास लावू शकत नाहीत. त्यांच्यासाठी ही सुवर्णसंधी आहे.

शिबिरामध्ये मोनिका वर्मा ब्युटी पार्लर तर प्रणिता कुटे शिवण क्लास शिकवत आहेत, असे कमलेश ऑटो युवा मंचचे प्रमुख संदीप भसे यांनी सांगितले.

## मोफत प्रशिक्षण शिबिर

**आळंदी** | दि. ३ (प्रतिनिधी)

**नवरात्राचे औचित्य साधून येथील** कमलेश ऑटो युवा मंचातर्फे कमलेश भसे यांनी महिलांसाठी मोफत शिवण क्लास व ब्युटी पार्लरचे व्यावसायिक प्रशिक्षण देण्याचा उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमात सुरेखा मोहिते, तसेच राष्ट्रवादीच्या उपाध्यक्ष शकुंतला साठे यांनी मार्गदर्शन केले.

या वेळी महिला बचत गटाच्या अध्यक्षा नंदा साबळे, शीतल कदम, शकुंतला बुचके, आसावरी भसे उपस्थित होत्या.



आळंदी-काळेवाडी येथे महिला बचत गटांनी आयोजित केलेल्या 'हळदी- कुंकू' कार्यक्रमात महिलांनी सहभाग घेतला.

## सौभाग्य लेण्याच्या आदान-प्रदानाचे अलंकापुरीत सोहळे

आळंदी, दि. ३ (वार्ताहर) - मराठमोळ्या संस्कृतीची जपवणूक करीत, जिव्हाळ्याचे नाते जोडून ते कायम टिकून राहावे, यासाठी अलंकापुरीत 'हळदी-कुंकवाच्या' माध्यमातून घरोघरीच नव्हे तर विविध महिला बचत गटांद्वारे ठिकठिकाणी आयोजित 'हळदी- कुंकवा'च्या कार्यक्रमांनी तब्बल पंधरा दिवस अवघी अलंकापुरी दुमदुमून निघाली.

काळेवाडी येथे मकर संक्रांतीनंतर भव्य-दिव्य असे हळदी-कुंकवाच्या सार्वजनिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत होते.

परिसरातील सर्व महिला बचत गटांच्या महिलांनी उपस्थिती दाखवून जिव्हाळ्याचे नातेसंबंध जुळवून ठेवल्याची साक्ष अशा कार्यक्रमातून मिळत असल्याचे कमलेश ऑटो युवा मंच प्रमुख संदीप भसे यांनी सांगितले.

राष्ट्रवादी महिला काँग्रेस आळंदी शहर प्रमुख रुपाली पानसरे, माऊली पार्क हौसिंग सोसायटी प्रमुख मीनाताई पाखरे यांनी सार्वजनिक हळदी-कुंकवा कार्यक्रम आयोजित केला होता. गणेश महिला बचत गटाच्या वतीने फक्त 'हळदी-कुंकू' नव्हे तर सौ. भारती मोरे, श्रीमती हेमलता शेवडे, सौ. उषा नरके, अनघा जोशी व इतर महिला भजनी मंडळाचा बहारदार कार्यक्रम ठेवला होता. विठ्ठल नामाची शाळा भरली, या भावगीताने जिल्हा परिषद सदस्या सौ. सुरेखाताई मोहिते देखील भारावून गेल्या होत्या.

घराघरातील आयोजित हळदी-कुंकवाच्या सौभाग्याच्या लेण्याच्या आदान-प्रदाना-बरोबरच तीळगुळासह, पान-सुपारी व वाण म्हणून एखादी वस्तू भेट दिली जाते. जन्मो-जन्मी हाच पती मिळावा याचे ते प्रतीक असल्याचे सौभाग्यवतींनी सांगितले.

मकरसंक्रांत ते ३१ जानेवारी या पंधरा दिवसांच्या कालावधीत आपापल्या परीने प्रत्येक घरा-घरात प्रतिवर्षी 'हळदी-कुंकवा'च्या कार्यक्रमांचे आयोजन करून मराठमोळ्या संस्कृतीचे जतन केले जाते.

## समाजकार्याची वृत्तपत्रांनी घेतलेली दखल

# दि. १३ जुलै रोजी दै. लोकमतने सामाजिक कार्याची घेतलेली दखल

## आळंदीत माऊलींचे स्वागत

आळंदी | दि. १३ (वार्ताहर)

**संतश्रेष्ठ** ज्ञानेश्वर महाराजांची पालखी पंढरीकडून आज आळंदी शहरामध्ये दाखल झाली. गेला एक महिना भगवान पांडुरंगांच्या भेटीसाठी गेलेल्या माऊलींचे आज आळंदी शहरामध्ये हरिनामाच्या गजरात 'माऊली, माऊली'च्या नामघोषामध्ये स्वागत करण्यात आले.

गेले ३३ दिवस पालखीसोबत गेलेल्या वारकऱ्यांनी आज आळंदीमध्ये येताच 'संत मंडळी आज भेटतील मज । तेणे मी होईल चतुर्भुज' हा अभंग गाऊन आळंदीत प्रवेश केला. देहूफाटा परिसरामध्ये माऊलींचे स्वागत



करण्यात आले. या वेळी अजित वडगावकर, संदीप भसे, नलावडे आदींनी माऊलींचे स्वागत केले. जुन्या पुलावरून माऊलींनी आळंदीत प्रवेश केला. ग्रामस्थांनी पालखी रथामधून काढून खांद्यावर घेऊन इंद्रायणी नदीवर गेली. नगरप्रदक्षिणा करून राममंदिर, विष्णूमंदिर, हरिहरेश्वर मंदिरामध्ये माऊलींची आरती व स्वागत करण्यात आले. शेवटी पालखी मंदिरात नेण्यात आली.

श्रीसंत रघुनाथ संतराज बिडकर (सरदार) यांचे वंशज सरदार हरप्रितसिंग बिडकर सरकार (माऊलींच्या घोड्यांचे मालक) यांच्यातर्फे माऊलींना दहीभाताचा नैवेद्य दाखवण्यात आला. या वेळी उमेश सरदार बिडकर, शांताराम मलठणकर, डी. डी. भोसले, प्रशांत सुरू, सुधीर पिंपळे (पालखी सोहळा प्रमुख), डॉ. शिवाजीराव मोहिते, कुऱ्हेकर महाराज, सुरेश वडगावकर, राहुल चिताळकर, मुख्याधिकारी विनायक औंधकर, प्रशांत बुऱ्हाडे, वर्षा कोद्रे व आळंदीकर उपस्थित होते.

शनिवार लोकमत पिंपरी चिंचवड



आषाढी वारीसाठी पंढरीस गेलेल्या जगद्गुरू संतश्रेष्ठ तुकाराममहाराजांचा पालखी सोहळा आज पिंपरी-चिंचवड शहरात परतला. मजल-दरमजल करीत मुंबई-पुणे महामार्गावरील खराळवाडीत दाखल झालेल्या सोहळ्याचे दृश्य.

## अलंकापुरीत माऊलींचे स्वागत

आळंदी | दि. १३ (वार्ताहर)

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांची पालखी पंढरीकडून आज आळंदी शहरामध्ये दाखल झाली. गेला एक महिना भगवान पांडुरंगांच्या भेटीसाठी गेलेल्या माऊलींचे आज आळंदी शहरामध्ये हरिनामाच्या गजरात 'माऊली, माऊली'च्या नामघोषामध्ये स्वागत करण्यात आले.

गेले ३३ दिवस पालखीसोबत गेलेल्या वारकऱ्यांनी आज आळंदीमध्ये येताच 'संत मंडळी आज भेटतील मज । तेणे मी होईल चतुर्भुज' हा अभंग गाऊन आळंदीत प्रवेश केला. देहूफाटा परिसरामध्ये माऊलींचे स्वागत करण्यात आले. या वेळी अजित वडगावकर, संदीप भसे, नलावडे आदींनी माऊलींचे स्वागत केले. जुन्या पुलावरून माऊलींनी आळंदीत प्रवेश केला. ग्रामस्थांनी पालखी रथामधून काढून खांद्यावर घेऊन इंद्रायणी नदीवर गेली. नगर प्रदक्षिणा करून राममंदिर, विष्णू मंदिर, हरिहरेश्वर मंदिरामध्ये माऊलींची आरती व स्वागत करण्यात आले. शेवटी पालखी मंदिरात नेण्यात आली.

श्रीसंत रघुनाथ संतराज बिडकर (सरदार) यांचे वंशज सरदार हरप्रितसिंग बिडकर सरकार (माऊलींच्या घोड्यांचे मालक) यांच्यातर्फे माऊलींना दहीभाताचा नैवेद्य दाखवण्यात आला. या वेळी उमेश सरदार बिडकर, शांताराम मलठणकर, डी. डी. भोसले, प्रशांत सुरू, सुधीर पिंपळे (पालखी सोहळा प्रमुख), डॉ. शिवाजीराव मोहिते, कुऱ्हेकरमहाराज, सुरेश वडगावकर, राहुल चिताळकर, मुख्याधिकारी विनायक औंधकर, प्रशांत बुऱ्हाडे, वर्षा कोद्रे व आळंदीकर उपस्थित होते.

> दरवर्षी पंढरपुर वरून येणाऱ्या संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे आळंदी पुण्यभूमीत जल्लोषात स्वागत करण्यात येते.





कमलेश ऑटो युवा मंच तर्फे नागरिकांना बालाजी दर्शन घडविण्यात आले.

# दि. १० मे रोजी दै. प्रभातने सामाजिक कार्याची घेतलेली दखल.

## आळंदीत रोज भागतेय ५०० जणांची भूक

**आळंदी -** आळंदी, देहूफाटा, काळेवाडी, काळेकॉलनी, तापकीर नगर, इंद्रायणी नगर, चऱ्होली भागातील जनतेची व अनेक कामगारांची, मोलमजुरी करणारे, बेघर तसेच भाडेकरी गोरगरिबांची उपासमार होऊ नये म्हणून अन्नछत्र सुरु करण्यात आले आहे. इथे रोज ४०० ते ५०० जणांना जेवण दिले जात आहे. आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे आळंदी रोड, काळेकॉलनी कमलेश ऑटो येथे अन्नछत्र सुरू आहे. त्यासाठी कमलेश ऑटो युवामंच प्रमुख संदीप भसे, खुशाल तापकीर, अतुल तापकीर, शुभम वेळकर, राहुल पवार, राहुल ढवळे, निखील पिंजण, किरण तळेकर, प्रमोद खाडे, मनोज लांडगे, अनिकेत हारगावकर, गणेश थोरवे, प्रवीण थोरवे, अमोल ढेरंगे, हर्षल पारवे तसेच कमलेश ऑटो युवा मंचचे सर्व कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.



**आळंदी (ता. खेड) :** येथे सोशल डिस्टन्सिंगचे तंतोतंत पालन करून अन्नदान करण्यात येत आहे.




करोनामुळे करण्यात आलेल्या लॉकडाऊन काळात आळंदी परिसरातील बेघर, कामगार व मोलमजुरांची उपासमार होऊ नये यासाठी अन्नदान सेवा वाटप करण्यात आले.

## दि. १७ मे रोजी दै. प्रभातने सामाजिक कार्याची घेतलेली दखल.



# आळंदीत ८०० जणांची आरोग्य तपासणी

**आळंदी, दि. १७ (वार्ताहर) -** करोनाच्या पार्श्वभूमीवर कमलेश ऑटो युवामंचच्या वतीने गेल्या १५ दिवसांमध्ये १० ते १५ हजार गरजूंना अन्न वाटप करण्यात आले. तर रविवारी (दि. १७) ८०० जणांची आरोग्य तपासणी करण्यात आली. तर भारतीय जैन संघटना यांनी रुग्णवाहिका, पीपीई कीट व गोळ्या-औषधे देऊन मोलाचे सहकार्य केले, अशी माहिती युवामंचचे प्रमुख संदीप भसे यांनी दिली.

आमदार दिलीप मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आळंदी देहुफाटा, काळेवाडी, काळे कॉलनी, तापकीरनगर, इंद्रायणीनगर, चऱ्होली भागातील जनतेची व अनेक कामगारांची, मोलमजुरी करणारे, बेघर तसेच भाडेकरी गोरगरिबांची उपासमार होऊ नये म्हणून अन्नछत्र सुरू करण्यात आले आहे. तर रविवारी आरोग्य तपासणी करून नागरिकांना दिलासा दिला आहे. यावेळी मयूर मोहिते, नगरसेविका विनया तापकीर, अजित काळभोर, भारत सातपुते, डॉ. सुनील जगताप, अशोक रहाणे, हर्षल बोरुडे, खुशाल तापकीर, अतुल तापकीर, शुभम वेळकर, प्रमोद पऱ्हाड, निखील पिंजण, अमोल ढेरंगे, हर्षल पारवे, आसावरी भसे, संजीवनी सस्ते, सपना लांडगे तसेच युवा मंचचे सर्व कार्यकर्ते नागरिकांची सेवा करीत आहे.

**आळंदी (ता. खेड) :** येथे कमलेश ऑटो युवामंचच्या वतीने नागरिकांची आरोग्य तपासणी करून अन्नदानही करण्यात आले.



करोनाच्या पार्श्वभुमीवर आळंदी परिसरातील नागरिकांसाठी
कमलेश ॲटो युवा मंच मार्फत मोफत आरोग्य तपासणी तसेच नागरिकांना
गोळ्या औषधे व पीपीई किटचे वाटप करण्यात आले.







जेष्ठ नागरिकांसाठी व महिलांसाठी बनेश्वर–बालाजी, नारायणपूर दर्शन, अशा तिर्थक्षेत्री सहलीद्वारे त्यांच्या मनात भक्तीमय वातावरण निर्माण करून चांगले व सुसंस्कृत विचार करण्याची प्रेरणा व सर्वांनी एकत्र येऊन समाजामध्ये वेगळा आदर्श निर्माण करण्याचा प्रयत्न केला.






प्रजासत्ताक दिनानिमित्त शाळेतील विद्यार्थांना खाऊचे वाटप करण्यात आले.



वाढदिवसाचे औचित्य साधून कमलेश ॲटो युवा मंच तर्फे
अनाथ आश्रमातील मुलांना बिस्किटांचे वाटप करण्यात आले.



आळंदी नगरपरिषदेवर संतप्त महिलांनी हंडामोर्चा काढला.

## संतप्त महिलांकडून

# आळंदीत पालिकेवर हंडामोर्चा

आळंदी | दि. २१ (वार्ताहर)

येथील काळेवाडी, काळे कॉलनी, देहूफाटा या विभागांमध्ये गेली २ महिने नियोजित पाणीपुरवठा होत नाही, याबाबत नगर परिषद कर्मचाऱ्यांना विचारले असता, मोटार जळाली, पगार झाला नही, लाइट नाही, पाइपलाइनमध्ये कचरा अडकला, पाइप फुटला असी उडवा-उडवीची उत्तरे दिली जातात. अखेर संतप्त महिलाकडून आज नगर परिषदेवर 'हंडा मोर्चा' काढण्यात आला. गेल्या २ महिन्यांमध्ये कधीही वेळेवर पाणी आले नाही. महिन्यातून ६ ते ७ वेळेसच पाणी सोडले जाते; पण तेही वेळेवर व व्यवस्थित येत नसल्याचे बोलले जाते.

शुद्ध पाणी देऊ शकत नसाल, तर कमीत कमी वेळेवर तरी पाणी द्या, असे येथील महिलांचे म्हणणे मार्चाच्या संदर्भात कल्पना देऊनसुद्धा मुख्याधिकारी धनंजय कोळेकर मात्र गैरहजर राहिले. गेल्या आठवड्यात या संदर्भात निवेदन देऊनही कोळेकर यांनी याबाबत कोणतीही हालचाल केली नाही. पाणीसंदर्भात २ दिवसांत योग्यती कारवाई न केली गेल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा संतप्त महिलांनी दिला. या मोर्चात महिला बचत गट अध्यक्षा नंदा साबळे, सुरेखा वाजे, मंदा पालवे, साधना महाले, साधा भारती, सविता भळगट, शोभा आवारे, त्रिशल बचुटे, गौरी गोळे, छाया नवगिरे, कुसुम सोमवंशी, संगीता बीडकर, उज्ज्वला चौधरी, कीर्ती बाफना, नंदा भसे, इंदू साळुंखे, वैशाली सोमवंशी, सुमित्रा भगत पल्लवी खरात, शोभा अवारे आदी महिला सहभागी झाल्या होत्या. हा मोर्चा कमलेश युवा मंचाचे प्रमुख संदीप भसे व माजी नगरसेवक संतोष चोरडिया यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आला.

काळेवाडी, काळे कॉलनी, देहुफाटा या परिसरात वारंवार पाणीपुरवठ्याची गैरसोयी विरोधात आवाज उठवत स्थानिक महिलांसोबत आळंदी नगरपालिकेवर हंडामोर्चा काढण्यात आला.






# विश्वासाचं दुसरं नाव 'कमलेश ऑटो'!

**आळंदीकरांना स्वतःचं वाहन आळंदीतूनच खरेदी करता यावं, हा विचार समोर ठेवून सुरू झालेलं आळंदीतलं पहिलं वहिलं शोरूम म्हणजे कमलेश ऑटो! संदीप भसे यांच्या दूरदृष्टीतून सुरू झालेला हा प्रवास ग्राहकांच्या विश्वासावर दिवसेंदिवस विस्तारतो आहे.**

झपाट्यानं विकसित होणारं शहर म्हणून आळंदीकडे आज पाहिलं जातं. गेल्या काही वर्षांत आळंदीचा चेहरा–मोहरा पूर्णतः बदलून गेला आहे. या विकासाला हातभार लावते ती ऑटोमोबाईल इंडस्ट्री अर्थात वाहनांच्या विक्रीचा व्यवसाय. आळंदी विकासाच्या दिशेनं झेपावत असताना सगळ्यात पहिल्यांदा भव्य ऑटोमोबाईल शोरूम सुरू करण्याचा मान जातो .तो म्हणजे 'कमलेश ऑटो'ला!

वर्ष १९९५ च्या आसपास सुरू झालेली ही परंपरा आजही तितक्याच विश्वासानं जपली जातेय. याचं सर्वस्वी श्रेय जातं संदीप मुरलीधर भसे यांना! देहूजवळ सांगोर्डी इथं त्यांचा जन्म झाला. आई–वडील शेती करायचे. त्यांचं बालपण गेलं ज्ञानेश्वर मासुळकर या पिंपरीतल्या मामाकडे. दहावीपर्यंतचं शिक्षण नवमहाराष्ट्र विद्यालयात पूर्ण केल्यानंतर ते नोकरीला लागले. 'रिकॉल्ड' कंपनीत १३ रुपये रोज असा पगार ठरला. नंतर नट–बोल्टला गेज बनवणाऱ्या 'ऑक्युसाईज' कंपनीत त्यांना 'लॅपर' म्हणून नोकरी मिळाली. तिथं त्यांचा पगार २२ रुपये रोज असा झाला. पुढं बजाज कंपनीतही काही काळ काम केलं. इथंच ऑटोमोबाईल इंडस्ट्रीचा परिचय झाला. दरम्यान मोठा भाऊ संतोष यांनी आळंदीत एक सर्व्हिस स्टेशन सुरू केलं होतं.

याच काळात संदीप भसे यांना नोकरीतून ब्रेक मिळाला. हीच संधी साधून त्यांनी व्यवसायात पदार्पण केलं. संतोष भसे यांच्यासोबत गाड्यांची सर्व्हिसिंग करून देण्याचं काम सुरू झालं. अधिकाधिक वाहने आपल्याकडे सर्व्हिसिंगला यावीत यासाठी संदीप भसे यांनी अनेक गोष्टी केल्या. ग्राहकांना उत्तम आणि पारदर्शक सेवा देणे, हे ब्रीद त्यांनी सुरुवातीपासून जपलं. आळंदीकरांना वाहन खरेदीला पिंपरी–चिंचवडला जायला लागू नये म्हणून वर्ष २००० मध्ये संदीप भसे यांनी 'कमलेश ऑटो' हे देखणं शोरूम आळंदीत सुरू केलं. एका विशिष्ट कंपनीची वाहनं न विकता 'मल्टिब्रँड' ही ओळख त्यांनी जपली. या सगळ्या प्रवासाबाबत ते सांगतात, 'सुरुवातीपासूनच वेगळं काही करावं असं वाटत होतं. त्याच दिशेनं प्रवास सुरू होता. लहानपणी गरिबीत दिवस काढले. हे वाईट दिवस संपून चांगले दिवस यावेत, हीच अपेक्षा सुरुवातीला होती. ती बदलण्यात आई नंदिनी आणि वडील मुरलीधर यांचा मोठा वाटा आहे. आपल्याकडे गाडी असावी, असं प्रत्येकाचं एक स्वप्न असतं. अशी कित्येकांची स्वप्न पूर्ण करण्याचं समाधान मला मिळालं, याचा आनंद आहे.' 'कमलेश ऑटो'नं गेल्या २० वर्षांत स्वतःचा एक हक्काचा ग्राहकवर्ग जोडला आहे. ग्राहकांचा विश्वास हेच त्यांचं ब्रीद आहे. संदीप भसे यांच्या प्रयत्नातून साकार झालेल्या या प्रवासाकडे पाहिलं तर 'विश्वासाचं दुसरं नाव म्हणजे कमलेश ऑटो' असंच म्हणावं लागतं.

## समाजकारणाची आवड : संदीप भसे

व्यवसायाच्या निमित्तानंच आमदार दिलीप मोहिते यांच्या संपर्कात संदीप भसे आले. त्यांचा पुतण्या मयूर मोहिते यांच्याशी चांगली मैत्रीही झाली. तेव्हापासून ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून सक्रिय झाले. 'ज्यांच्याकडे बघून आपणही राजकारणात यावं, असं मला वाटलं, त्यांच्याकडे आकर्षित झालो, ते म्हणजे दिलीप मोहिते! त्यांची काम करण्याची पद्धत खूप वेगळी आहे. कुणीही माणूस त्यांच्याकडे कोणतीही अडचण घेऊन गेल्यास त्यातून मार्ग निघतोच. पक्षाच्या माध्यमातून भागात कार्यरत असताना कोणतीही अपेक्षा नसताना २०११ मध्ये त्यांनी मला नगरपरिषद निवडणूक लढविण्याची संधी दिली. मी निवडून येण्यासाठी ते स्वतः आणि त्यांचे कुटुंबीय आळंदीत मुक्कामी होते. हीच माझ्यासाठी खूप मोलाची गोष्ट होती. पण त्या निवडणुकीत पराभव पत्करावा लागला. पण तरीही समाजासाठी काम करायचं आहे. त्यामुळं मी त्यानंतरही अधिक सक्रिय राहिलो. रक्तदान शिबिरं, महिलांसाठी शिवणक्लास, ब्युटी पार्लर प्रशिक्षण अशा विविध गोष्टी केल्या. तसेच लोकांच्या समस्या सोडविण्यावरही भर दिला. आजही परिसरातील नागरिकांना अनंत अडचणीतून जावे लागते. शहराचा विकास ज्या वेगानं व्हायला हवा, त्या वेगानं तो होत नाहीये. नागरिकांना हव्या त्या सोयीसुविधा मिळण्यासाठी तत्परतेनं मिळण्यासाठी कार्यरत राहणार आहे.'

(संकलन : एम. डी पाखरे, आळंदी)

रविवार दि.५ जानेवारी २०२० रोजी
कमलेश ऑटोची दै. प्रभात ने घेतलेली दखल

# समाजकार्य अहवाल

| | |
|---|---|
| १ | महिला सक्षमीकरण व बळकटीकरणासाठी आळंदी परिसरातील महिलांसाठी मोफत ब्युटी पार्लर. |
| २ | आळंदी परिसरातील महिला व बचत गटांसाठी शिवण क्लासचे आयोजन व शिलाई मशिनचे वाटप करण्यात आले. |
| ३ | कोजागिरी पोर्णिमे निमित्ताने परिसरातील महिलांसाठी होम मिनीस्टर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. |
| ४ | मकरसंक्रांती सणाच्या निमित्ताने परिसरातील महिलांसाठी हळदी-कुंकवाचा कार्यक्रम घेण्यात आला. |
| ५ | कमलेश ॲटो ग्रुपतर्फे महिलांसाठी क्रिडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. |
| ६ | कमलेश ॲटो ग्रुपतर्फे करण्यात आलेल्या सामाजिक कार्याची वृत्तपत्रांनी घेतलली दखल. |
| ७ | दरवर्षी पंढरपूर वरून येणाऱ्या संतश्रेष्ठ श्री. ज्ञानेश्वर महाराज पालखीचे आळंदी पुण्यभूमीत जल्लोषात स्वागत करण्यात येते. |
| ८ | कमलेश ॲटो युवा मंच तर्फे नागरिकांना बालाजी दर्शन घडविण्यात आले. |
| ९ | करोनामुळे करण्यात आलेल्या लॉकडाऊन काळात आळंदी परिसरातील बेघर, कामगार व मोलमजुरांची उपासमार होऊ नये यासाठी अन्नदान सेवा वाटप करण्यात आले. |
| १० | करोनाच्या पार्श्वभूमीवर आळंदी परिसरातील नागरिकांसाठी कमलेश ॲटो युवा मंच मार्फत मोफत आरोग्य तपासणी तसेच नागरिकांना गोळ्या औषधे व पीपीई किटचे वाटप करण्यात आले. |

| | |
|---|---|
| ११ | जेष्ठ नागरिकांसाठी व महिलांसाठी बनेश्वर-बालाजी, नारायणपूर दर्शन अशा तिर्थक्षेत्री सहलीद्वारे त्यांच्या मनात भक्तीमय वातावरण निर्माण करून चांगले व सुसंस्कृत विचार करण्याची प्रेरणा व सर्वांनी एकत्र येऊन समाजामध्ये वेगळा आदर्श निर्माण करण्याचा प्रयत्न केला. |
| १२ | प्रजासत्ताक दिनानिमीत्त शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. |
| १३ | वाढदिवसाचे औचित्य साधून कमलेश ॲटो युवा मंच तर्फे अनाथ आश्रमातील मुलांना बिस्किटांचे वाटप करण्यात आले. |
| १४ | काळेवाडी, काळे कॉलनी, देहुफाटा या परिसरात वारंवार पाणीपुरवठ्याची गैरसोयी विरोधात आवाज उठवत स्थानिक महिलांसोबत आळंदी नगरपालिकेवर हंडामोर्चा काढण्यात आला. |
| १५ | रविवार दि. ०५ जानेवारी २०२० रोजी कमलेश ॲटोच्या सामाजिक कार्याची दै. प्रभातने घेतलेली दखल. |
| १६ | प्रशासनाच्या चुकीच्या कामाच्या विरोधात उठवलेल्या आवाजाची दैनिक वर्तमानपत्राने सामाजिक कार्याची घेतलेली दखल. |
| १७ | हॉस्पिटल लोकार्पण सोहळा दैनिक वर्तमानपत्राने सामाजिक कार्याची घेतलेली दखल. |
| १८ | दैनिक वर्तमानपत्राने सामाजिक कार्याची घेतलेली दखल. |

## हॉस्पिटल लोकार्पण सोहळा दैनिक वर्तमानपत्राने सामाजिक कार्याची घेतलेली दखल

# अत्याधुनिक कमलेश हॉस्पिटल रुग्णांच्या विश्वासास पात्र ठरेल !



**आळंदी / प्रतिनिधी**

अत्याधुनिक सोयी सुविधांनी सुसज्ज असे २४ तास अपघात व आपत्कालीन सेवांसह विविध स्पेशालिटी घेऊन कमलेश मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटल अँण्ड ट्रॉमा केअर सेंटरचे मोशी आळंदी रोड, डुडुळगाव येथे आमदार दिलीप मोहिते पाटील व आमदार महेश लांडगे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. रुग्णसेवेचे अखंड व्रत घेऊन संदीप भसे व संतोष भसे यांनी कुटुंबासह या हॉस्पिटलची स्थापना केली असून आळंदी पंचक्रोशीतील भाविक,नागरिक, वारकरी यांच्या आरोग्यासाठी उत्तम दर्जाच्या आरोग्यसेवा उपलब्ध होणार असल्याचे आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी सांगितले.

भसे परिवाराने खेड हवेली तालुक्याच्या पंचक्रोशीतील रुग्णांसाठी या अत्याधुनिक हॉस्पिटलची उभारणी केली. हे हॉस्पिटल भविष्यात रुग्णांच्या विश्वासास नक्कीच पात्र ठरेल असा विश्वास यावेळी आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी व्यक्त केला. या अत्याधुनिक हॉस्पिटलच्या उभारणीमुळे खेड तालुक्यातील तमाम रुग्णांना वाजवी दरात आरोग्यसुविधा मिळण्यास नक्कीच फायदा होईल असे सांगितले.

यावेळी पिंपरी चिंचवडचे माजी महापौर नितीनआप्पा काळजे, माजी महापौर राहुल जाधव, खेड तालुका कृ.उ.बा. समितीचे सभापती बाळशेठ ठाकूर, पुणे महानगर नियोजन समितीचे सदस्य वसंतराव भसे, नगरसेवक राहुल कलाटे, शिवसेनेचे माजी जिल्हाध्यक्ष रामशेठ गावडे, नगरसेविका विनयाताई तापकीर, नगरसेविका साधनाताई तापकीर, नगरसेविका सुवर्णाताई बुर्डे, युवा नेते प्रदीप आबा तापकीर, नगरसेविका रुक्मिणी कांबळे, कामगार नेते संतोष कापसे, कामगार नेते योगेश तळेकर, आळंदी माजी नगराध्यक्ष रोहिदास तापकीर, राष्ट्रवादीचे युवा नेते नवनाथभाऊ तापकीर, नगरसेवक आदित्य घुंडरे, युवा नेते नितीन घुंडरे, उद्योजक सुरेश झोंबाडे समस्त भसे परिवार, त्यांचे सर्व डॉक्टर टीम आळंदी चऱ्होली ,मोशी, केळगाव, डुडुळगाव परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन बाळासाहेब तापकीर यांनी केले.

## प्रशासनाच्या चुकीच्या कामाच्या विरोधात उठवलेल्या आवाजाची दैनिक वर्तमानपत्राने सामाजिक कार्याची घेतलेली दखल

# आळंदी नगरपरिषदेच्या मतदारयादीत घोळ

### एका प्रभागातील मतदारांची नावे दुसऱ्या प्रभागात

> या मतदारयाद्या नसून प्रारूप स्वरूपाच्या असून, अंतिम नाहीत. कोणाला काही हरकती असतील तर त्यांनी त्या नोंदवाव्यात. स्थळ पाहणी अहवाल तयार करून आवश्यक ती दुरुस्ती केली जाईल. **–अंकुश जाधव**, मुख्याधिकारी आळंदी

**आळंदी, दि. २७ (वार्ताहर)** - आळंदी नगरपरिषदेची निवडणूकसमोर येऊन ठेपली आहे. त्या अनुषंगाने प्रारूप मतदार याद्या प्रभागनिहाय करण्यात आल्या आहेत; परंतु मतदार यादीत मतदारांची नावे एका प्रभागातून दुसऱ्या प्रभागात समाविष्ट करण्यात आली आहेत. त्यामुळे मतदार यादीतील घोळ मतदारांना डोकेदुखी देणारा ठरला आहे.

आळंदी नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी १० प्रभाग पडले आहेत. त्यातील ३ प्रभाग नदीपलीकडे देहुफाटा, इंद्रायणीनगर काळेवाडी, काळे कॉलनी या भागात पडले आहेत. यातील ९ नंबर प्रभागातील नावे ८ नंबर व १० नंबर प्रभागात समाविषट करण्यात आली असल्याचे युवा कार्यकर्ते संदिप भसे यांनी सांगितले. तसेच चोविसावाडी, चूहोली बु, केळगाव, लोहगाव, रासे, भोसे, तुळापूर या आळंदी नगर परिषद सोडून बाहेरील गावातील नागरीकांची नावे आलंदी प्रभाग ८, ९, १० मध्ये समाविष्ठ झालीच कशी याची चौकशी नगरपरिषद अधिकाऱ्यांनी करावी.

आळंदी नगरपरीषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार याद्या तयार करीत असताना राजकीय हस्तक्षेप झाला आहे. त्यामुळे मतदारांना हरकती व सचूना दाखल करण्यासाठी किमान ३० दिवसांची मुदतवाढ द्यावी. तसेच, मतदार याद्यांमध्ये सुधारणा करावी, आळंदी मुख्याधिकारी व निवडणूक विभागाचे अधिकारी यांच्यावर हक्कभंगाचा प्रस्ताव आणणार आहे.

प्रभात Tue, 28 June 2022
https://epaper.eprabhat.net/c/68859962

## प्रशासनाच्या चुकीच्या कामाच्या विरोधात उठवलेल्या आवाजाची दैनिक वर्तमानपत्राने सामाजिक कार्याची घेतलेली दखल

भाग सकाळ TODAY | पुणे, गुरुवार, ३० जून २०२२ | ५

### हरकती : प्रारूप यादीत दोष असल्यामुळे मतदार, इच्छुकांची नाराजी

# मतदार यादीत मराठवाड्यातील नावे

**आळंदी, ता. २९ :** आळंदी नगरपरिषद सार्वत्रिक पंचवार्षिक निवडणुकीसाठी तयार केलेल्या प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादीत मोठ्या प्रमाणात दोष असल्याने यासाठी सूचना, हरकती इच्छुक उमेदवारांसह नागरिकांनी केल्या होत्या. प्रत्येक प्रभागात लगतच्या गावातील मतदार, नातेवाइकांच्या नावासह खानदेश, मराठवाड्यातील नावे बीएलओ सर्वेक्षणाविनाच मतदार यादीत घुसडवल्याचे चित्र आहे. या मुदतीत आळंदी शहरातील नागरिक, मतदार तसेच इच्छुक उमेदवार यांनी अभ्यास करून मतदार यादीत प्रचंड दोष असल्याने कामकाजाची नाराजी व्यक्त करीत सूचना हरकती प्रशासनाकडे सुपूर्द केल्या.

आळंदी नगरपरिषद प्रशासनास या संदर्भात निवेदन देऊन हरकतींसह सूचना देण्यात आल्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस माजी नगरसेवक प्रकाशशेठ कुऱ्हाडे, युवानेते रोहन कुऱ्हाडे, दिनेश घुले, संदीप भसे आदी उपस्थित होते. यावेळी नगरपरिषदेचे वतीने विभाग प्रमुख अर्जुन घोडे यांनी निवेदन स्वीकारले.

आळंदी नगरपरिषदेची सार्वत्रिक पंचवार्षिक निवडणूक होत आहे. यासाठी नुकतीच अंतिम प्रभाग रचना व प्रभाग आरक्षणास मंजुरी देण्यात आली. त्या नंतर आळंदी नगरपरिषद प्रशासनाने राज्य निवडणूक आयोगाचे मार्गदर्शक सूचना व जाहीर कार्यक्रमाप्रमाणे येथील दहाप्रभागासाठी प्रारूप मतदार यादी जाहीर करून लोकांसाठी सूचना, हरकती देण्यास मुदत दिली.

आळंदी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२२ साठी आळंदी नगरपरिषदेने अंतिम प्रभाग रचना मंजूर केली आहे. त्या नंतर मंजूर प्रभाग रचने प्रमाणे खेड आळंदी विधान सभेची मतदार यादी संदर्भ घेऊन प्रभाग रचनेच्या कार्यक्षेत्रात राहणाऱ्या मतदारांची प्रभाग निहाय मतदार यादी सूचना हरकती साठी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्याची असताना यात मोठ्या प्रमाणात इतर प्रभागातील नावे तसेच आळंदी पंचक्रोशीतील नावे असल्याचे संदीप भसे यांनी सांगितले. आळंदीत नसलेल्या इतर गावांतील नागरिकांची नावे आळंदीच्या मतदार यादीत असल्याने स्थानिकांच्या प्रचंड नाराजी आहे. यात राजकीय दबावाला बळी पडून प्रशासन काम तर करत नाही असा सवाल आळंदीकर वि[illegible] आहेत.

> **प्रशासनाने या संदर्भात लोकांना अवगत केले आहे. प्रशासनास आलेल्या सूचना व हरकती अर्ज तपासून तसेच सोबत जोडलेली कागदपत्रे पाहून प्रशासकीय कामकाज निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार केले जाईल. वेळ मिळावा म्हणून सुटीच्या दिवशीही कार्यालय सुरू ठेवून या संदर्भातील कामकाज केले जाईल.**
> **- अंकुश जाधव,**
> मुख्याधिकारी, आळंदी नगरपरिषद

#### प्रशासनाकडून कर्तव्यात कसूर करीत घोळ

**प्रशासनाने इतर गावांतील मतदारांची नावे समाविष्ट केली आहेत. मूळ प्रभागातील अनेक नावे दुसऱ्याच प्रभागात टाकली आहेत. यामुळे प्रारूप मतदार यादी तयार करण्याच्या कामात प्रशासनाने कर्तव्यात कसूर करीत घोळ घातला आहे, असे एका इच्छुकाने 'सकाळ'शी बोलताना सांगितले. सर्व प्रभागांतील मतदार यादीत दुबार नावे आहेत. प्रभाग क्रमांक १ ते १० मध्ये त्या त्या प्रभागातील मयत नावेदेखील नगरपरिषद जन्म-मृत्यू नोंदणी विभागाच्या माध्यमातून मयत रजिस्टरप्रमाणे तपासणी करून मयत मतदार नागरिकांची नावेदेखील तत्काळ वगळण्यात यावीत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.**

---

### आळंदी प्रारूप मतदार यादीस हरकतींचा वर्षाव

**आळंदी : (स. गांवकरी) :** आळंदी येथील आळंदी नगरपरिषद सार्वत्रिक पंचवार्षिक निवडणुकीसाठी तयार करण्यात आलेल्या प्रभाग निहाय प्रारूप मतदार यादीत मोठ्या प्रमाणात दोष असल्याने यासाठी सूचना हरकतींचा इच्छुक उमेदवारांनी शेकडो अर्ज देत वर्षाव केला. आळंदी नगरपरिषद प्रशासनास या संदर्भात निवेदन देऊन हरकतीसह सूचना देण्यात आल्या. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस माजी नगरसेवक प्रकाशशेठ कुऱ्हाडे, युवानेते रोहन कुऱ्हाडे, केतन कुऱ्हाडे, सौरभ गव्हाणे, सुदर्शन शिंदे, ओम गंगोत्री, संकेत पाटील,मारुती कबितके, निखिल बनसोडे आदी उपस्थित होते. यावेळी नगरपरिषदेचे वतीने विभाग प्रमुख अर्जुन घोडे यांनी निवेदन स्वीकारले. आळंदी नगरपरिषदेची सार्वत्रिक पंचवार्षिक निवडणूक होत आहे. यासाठी नुकतीच अंतिम प्रभाग रचना व प्रभाग आरक्षणास मंजुरी देण्यात आली. त्या नंतर आळंदी नगरपरिषद प्रशासनाने राज्य निवडणूक आयोगाचे मार्गदर्शक सूचना व जाहीर कार्यक्रमा प्रमाणे येथील १ ते १० प्रभागांची प्रारूप मतदार यादी जाहीर करून लोकांसाठी सूचना, हरकती देण्यास मुदत दिली. या मुदतीत आळंदी शहरातील नागरिक, मतदार तसेच इच्छुक उमेदवार यांनी अभ्यास करून मतदार यादीत प्रचंड दोष असल्याने कामकाजाची नाराजी व्यक्त करीत सूचना हरकती प्रशासनाकडे सुपूर्द केल्याचे आळंदी शहर राष्ट्रवादी काँग्रेसचे युवानेते रोहन कुऱ्हाडे, कमलेश ऑटोचे संदीप भसे आदींनी या झालेल्या कामकाजावर नाराजी व्यक्त करीत हरकती पोच करीत हरकत घेण्यात आल्या. आळंदी नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२२ साठी आळंदी नगरपरिषदेने अंतिम प्रभाग रचना मंजूर केली आहे.

## हॉस्पिटल लोकार्पण सोहळा दैनिक वर्तमानपत्राने सामाजिक कार्याची घेतलेली दखल

# अत्याधुनिक कमलेश हॉस्पिटल रुग्णांच्या विश्वासास पात्र ठरेल !



**आळंदी / प्रतिनिधी**

अत्याधुनिक सोयी सुविधांनी सुसज्ज असे २४ तास अपघात व आपत्कालीन सेवांसह विविध स्पेशालिटी घेऊन कमलेश मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटल अँण्ड ट्रॉमा केअर सेंटरचे मोशी आळंदी रोड, डुडुळगाव येथे आमदार दिलीप मोहिते पाटील व आमदार महेश लांडगे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. रुग्णसेवेचे अखंड व्रत घेऊन संदीप भसे व संतोष भसे यांनी कुटुंबासह या हॉस्पिटलची स्थापना केली असून आळंदी पंचक्रोशीतील भाविक,नागरिक, वारकरी यांच्या आरोग्यासाठी उत्तम दर्जाच्या आरोग्यसेवा उपलब्ध होणार असल्याचे आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी सांगितले.

भसे परिवाराने खेड हवेली तालुक्याच्या पंचक्रोशीतील रुग्णांसाठी या अत्याधुनिक हॉस्पिटलची उभारणी केली. हे हॉस्पिटल भविष्यात रुग्णांच्या विश्वासास नक्कीच पात्र ठरेल असा विश्वास यावेळी आमदार दिलीप मोहिते पाटील यांनी व्यक्त केला. या अत्याधुनिक हॉस्पिटलच्या उभारणीमुळे खेड तालुक्यातील तमाम रुग्णांना वाजवी दरात आरोग्यसुविधा मिळण्यास नक्कीच फायदा होईल असे सांगितले.

यावेळी पिंपरी चिंचवडचे माजी महापौर नितीनआप्पा काळजे, माजी महापौर राहुल जाधव, खेड तालुका कृ.उ.बा. समितीचे सभापती बाळशेठ ठाकूर, पुणे महानगर नियोजन समितीचे सदस्य वसंतराव भसे, नगरसेवक राहुल कलाटे, शिवसेनेचे माजी जिल्हाध्यक्ष रामशेठ गावडे, नगरसेविका विनयाताई तापकीर, नगरसेविका साधनाताई तापकीर, नगरसेविका सुवर्णाताई बुर्डे, युवा नेते प्रदीप आबा तापकीर, नगरसेविका रुक्मिणी कांबळे, कामगार नेते संतोष कापसे, कामगार नेते योगेश तळेकर, आळंदी माजी नगराध्यक्ष रोहिदास तापकीर, राष्ट्रवादीचे युवा नेते नवनाथभाऊ तापकीर, नगरसेवक आदित्य घुंडरे, युवा नेते नितीन घुंडरे, उद्योजक सुरेश झोंबाडे समस्त भसे परिवार, त्यांचे सर्व डॉक्टर टीम आळंदी चऱ्होली ,मोशी, केळगाव, डुडुळगाव परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन बाळासाहेब तापकीर यांनी केले.

## हॉस्पिटल लोकार्पण सोहळा दैनिक वर्तमानपत्राने सामाजिक कार्याची घेतलेली दखल

राष्ट्र सह्याद्री 10 Jan 2022 - 10 Jan 2022 - Pag



# कमलेश हॉस्पिटल अँण्ड ट्रॉमा केअर सेंटरचे उद्घाटन

आळंदी : अत्याधुनिक सोयीसुविधांनी सुसज्ज असे २४ तास अपघात व आपत्कालीन सेवा यांसह विविध स्पेशालिटी घेऊन कमलेश मल्टीस्पेशलिटी हॉस्पिटल अँण्ड ट्रॉमा केअर सेंटरचे मोशी आळंदी रोड, डुडुळगाव येथे आमदार दिलीप मोहिते पाटील व आमदार महेश लांडगे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. रुग्णसेवेचे अखंड व्रत घेऊन संदीप भसे व संतोष भसे यांनी कुटुंबासह या हॉस्पिटलची स्थापना केली आहे. यामुळे या भागातील नागरिकांना उत्तम दर्जाच्या आरोग्यसेवा उपलब्ध होणार आहेत. यावेळी पिंपरी चिंचवडचे माजी महापौर नितीन काळजे,माजी महापौर राहुल जाधव,मा.सभापती बाळशेठ ठाकूर,पीएमआरडी सदस्य वसंत भसे,नगरसेवक राहुल कलाटे,शिवसेनेचे माजी जिल्हाध्यक्ष राम गावडे,नगरसेविका विनया तापकीर,नगरसेविका साधना तापकीर,नगरसेविका सुवर्णा बुर्डे, परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब तापकीर यांनी केले.

---

प्रभात | जिल्हा | रविवार, दि. ९ जानेवार

# गुड म



डुडुळगाव (ता. हवेली) : कमलेश हॉस्पिटलचे उद्घाटन करताना आमदार दिलीप मोहिते पाटील, आमदार महेश लांडगे, कमलेश भसे, संतोष भसे व इतर मान्यवर.

# 'कमलेश' रुग्णांच्या विश्वासास पात्र ठरेल

**आमदार मोहिते : मल्टिस्पेशालिलिटी हॉस्पिटल, ट्रॉमा केअर सेंटरचे उद्घाटन**

**आळंदी, दि. ८ (वार्ताहर) -** भसे परिवाराने खेड-हवेली तालुक्याच्या पंचक्रोशीतील रुग्णांसाठी अत्याधुनिक हॉस्पिटलची उभारणी केली. हे हॉस्पिटल भविष्यात रुग्णांच्या विश्वासास नक्कीच पात्र ठरेल. या अत्याधुनिक हॉस्पिटलच्या उभारणीमुळे खेड तालुक्यातील रुग्णांना वाजवी दरात आरोग्यसुविधा मिळण्यास नक्कीच फायदा होईल, असा विश्वास खेड-आळंदी विधानसभा मतदारसंघाचे आमदार दिलीप मोहिते-पाटील यांनी व्यक्त केला.

अत्याधुनिक सोयीसुविधांनी सुसज्ज असे २४ तास अपघात व आपत्कालीन सेवा यांसह विविध स्पेशालिटी घेऊन कमलेश मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल अँण्ड ट्रॉमा केअर सेंटरचे मोशी-आळंदी रस्ता, डुडुळगाव येथे आमदार दिलीप मोहिते पाटील व भोसरी विधानसभेचे आमदार महेश लांडगे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले. रुग्णसेवेचे अखंड व्रत घेऊन संदीप भसे व संतोष भसे यांनी कुटुंबासह या हॉस्पिटलची स्थापना केली आहे. यावेळी पिंपरी चिंचवडचे माजी महापौर नितीन काळजे, माजी महापौर राहुल जाधव, खेड तालुका बाजार समितीचे माजी सभापती बाळशेठ ठाकूर, पुणे महानगर नियोजन समितीचे सदस्य वसंतराव भसे, नगरसेवक राहुल कलाटे, शिवसेनेचे माजी जिल्हाध्यक्ष राम गावडे, नगरसेविका विनया तापकीर, नगरसेविका साधना तापकीर, नगरसेविका सुवर्णा बुर्डे, युवा नेते प्रदीप तापकीर, नगरसेविका रुक्मिणी कांबळे, मंगला बेळकर कामगार नेते संतोष कापसे, योगेश तळेकर, राष्ट्रवादीचे युवा नेते नवनाथ तापकीर, नगरसेवक आदित्य घुंडरे, युवा नेते नितीन घुंडरे, उद्योजक सुरेश झोंबाडे, समस्त भसे परिवार, सर्व डॉक्टर, नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब तापकीर यांनी केले.

प्रभात Sun, 09 January 2022 https://epaper.eprabhat.net/c/654

## दैनिक वर्तमानपत्राने सामाजिक कार्याची घेतलेली दखल



आळंदी (ता. खेड) : रक्तदान शिबिरातील रक्तदात्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले .

# आळंदीत १०३ जणांचे रक्तदान

**आळंदी, दि. ९ (वार्ताहर)** - कमलेश मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटलच्या पहिल्या वर्धापन दिनानिमित्त आळंदी (ता. खेड) येथे रक्तदान व आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या शिबिरात १०३ जणांनी रक्तदान केले. रक्तदात्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले.

याप्रसंगी प्रशांत कुऱ्हाडे, कमलेश ऑटोचे संदीप भसे, गणेश थोरवे, युवा उद्योजक राहुल चव्हाण, कमलेश मल्टी स्पेशलिस्टचे संचालक कमलेश मल्टी स्पेशलिस्ट संचालक डॉ. भूषण जगताप, डॉ. अक्षय शिंगारे, डॉ. अंकित मिश्रा, डॉ. प्रियंका कुंभार, हिरामण तळेकर, साईनाथ ताम्हणे, मयूर कुऱ्हाडे यांच्यासह संपूर्ण हॉस्पिटल स्टाफ उपस्थित होता.

## प्रशासनाच्या चुकीच्या कामाच्या विरोधात उठवलेल्या आवाजाची दैनिक वर्तमानपत्राने सामाजिक कार्याची घेतलेली दखल

# आळंदी नगरपरिषदेच्या मतदारयादीत घोळ

### एका प्रभागातील मतदारांची नावे दुसऱ्या प्रभागात

> या मतदारयाद्या नसून प्रारूप स्वरूपाच्या असून, अंतिम नाहीत. कोणाला काही हरकती असतील तर त्यांनी त्या नोंदवाव्यात. स्थळ पाहणी अहवाल तयार करून आवश्यक ती दुरुस्ती केली जाईल. **–अंकुश जाधव**, मुख्याधिकारी आळंदी

**आळंदी, दि. २७ (वार्ताहर)** - आळंदी नगरपरिषदेची निवडणूकसमोर येऊन ठेपली आहे. त्या अनुषंगाने प्रारूप मतदार याद्या प्रभागनिहाय करण्यात आल्या आहेत; परंतु मतदार यादीत मतदारांची नावे एका प्रभागातून दुसऱ्या प्रभागात समाविष्ट करण्यात आली आहेत. त्यामुळे मतदार यादीतील घोळ मतदारांना डोकेदुखी देणारा ठरला आहे.

आळंदी नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी १० प्रभाग पडले आहेत. त्यातील ३ प्रभाग नदीपलीकडे देहुफाटा, इंद्रायणीनगर काळेवाडी, काळे कॉलनी या भागात पडले आहेत. यातील ९ नंबर प्रभागातील नावे ८ नंबर व १० नंबर प्रभागात समाविष्ट करण्यात आली असल्याचे युवा कार्यकर्ते संदिप भसे यांनी सांगितले. तसेच चोविसावाडी, चूहोली बु, केळगाव, लोहगाव, रासे, भोसे, तुळापूर या आळंदी नगर परिषद सोडून बाहेरील गावातील नागरीकांची नावे आलंदी प्रभाग ८, ९, १० मध्ये समाविष्ट झालीच कशी याची चौकशी नगरपरिषद अधिकाऱ्यांनी करावी.

आळंदी नगरपरीषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार याद्या तयार करीत असताना राजकीय हस्तक्षेप झाला आहे. त्यामुळे मतदारांना हरकती व सचूना दाखल करण्यासाठी किमान ३० दिवसांची मुदतवाढ द्यावी. तसेच, मतदार याद्यांमध्ये सुधारणा करावी, आळंदी मुख्याधिकारी व निवडणूक विभागाचे अधिकारी यांच्यावर हक्कभंगाचा प्रस्ताव आणणार आहे.

प्रभात Tue, 28 June 2022
https://epaper.eprabhat.net/c/68859962